थोडक्यात...

शिक्षक पदोन्नतीला खीळ

नाशिक । राज्यातील जिल्हा परिषद शाळांमध्ये कार्यरत हजारो शिक्षकांच्या पदोन्नती प्रक्रियेला पुन्हा खीळ बसली आहे. मुंबई उच्च न्यायालयाचा अंतिम अथवा अंतरिम आदेश प्राप्त होईपर्यंत पदोन्नती प्रक्रिया थांबविण्याचे स्पष्ट निर्देश शालेय शिक्षण राज्यमंत्री पंकज भोयर यांनी दिले आहेत. त्यामुळे मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख आणि विस्तार अधिकारी पदांवर बढतीच्या प्रतीक्षेत असलेल्या शिक्षकांना आणखी प्रतीक्षा करावी लागणार आहे.

दाखल्यासाठी अभियान

नाशिक । जिल्ह्यातील सर्व राज्य शासकीय निवृत्तीवेतनधारक व कुटुंब निवृत्तीवेतनधारकांसाठी डिजिटल हयातीचा दाखला सादर करण्याकरिता विशेष अभियान राबविण्यात येणार आहे. या अभियानांतर्गत नाशिक जिल्हा कोषागार कार्यालयासह तालुकास्तरीय उपकोषागार कार्यालयांमध्ये १९ व २० नोव्हेंबर रोजी कार्यालयीन वेळेत विशेष सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

फराळाचे वाटप

नाशिक । कर्मयोगी बहुउद्देशिय सेवाभावी संस्थेच्यावतीने आदिवासी अतिदुर्गम भागातील त्र्यंबक तालुक्यातील पाड्यांवर दिवाळी फराळाचे व कपड्यांचे वाटप करण्यात आले. यावेळी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष पंकज पळसकर, केशव तांबे, काशिनाथ खडसे, उमेश पटेल, विनय शेरताटे, विकी बांगर, श्रेयांश पळसकर उपस्थित होते.

आदिवासी बांधवांना फराळ

नाशिक । श्री गाडगे महाराज धर्मशाळा ट्रस्टतर्फे पेठ तालुक्यातील खरपडी, फणसपाडा या भागातील आदिवासी बांधवांना फराळाचे वाटप करण्यात आले. यावेळी कुणाल देशमुख, नंदकिशोर उदावंत, संजय राऊत, दर्शन घुगे, बापू शौचे उपस्थित होते. महिलांना साड्यांचे वाटप करण्यात आले.

पक्षी मानचिन्हाचा आज निकाल

'आपलं पर्यावरण'च्या उपक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

नाशिक । प्रतिनिधी

नाशिकच्या पक्षी मानचिन्ह निवड प्रक्रियेचा निकाल गुरुवार (दि.१९) रोजी सकाळी ११.१५ वाजता जाहीर करण्यात येणार आहे.

कार्यक्रमास जिल्हाधिकारी, महापौर, उपमहापौर, आमदार तसेच वन विभागातील संबंधित अधिकारी उपस्थित राहणार आहेत. महापालिका आयुक्त अथवा महापौर यांच्या दालनात सोयीच्या ठिकाणी हा कार्यक्रम होणार आहे.

ङ्कआपलं पर्यावरणफ संस्थेच्या पुढाकाराने राबविण्यात आलेल्या या उपक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून, आतापर्यंत ३ हजार ३२ नागरिकांनी मतदानाद्वारे सहभाग नोंदविला आहे. अनेक कुटुंबांमध्ये कुटुंबातील एकाच व्यक्तीने मतदान केले. त्यामुळे प्रत्यक्ष मतदानाच्या संख्येपेक्षा या उपक्रमाचा पोहोच अधिक व्यापक असल्याचे आयोजकांचे म्हणणे आहे.

पक्षी मानचिन्ह निवडण्यापुरता हा उपक्रम मर्यादित नसून पक्ष्यांचे महत्त्व, त्यांचे नैसर्गिक अधिवास, जैवविविधता आणि निसर्ग संवर्धनाची गरज याबाबत नागरिकांमध्ये जनजागृती करणे हा मुख्य उद्देश होता. ऑनलाइन मतदानासाठी टठ कोड आणि लिंकचा वापर करताना सायबर गुन्ह्यांच्या वाढत्या घटनांमुळे काही नागरिकांनी सहभाग घेण्यास संकोच केला. तसेच विविध अडचणी व विरोधाला सामोरे जावे लागले. तरीही ३,०३२ नागरिकांनी नोंदविलेला सहभाग हा समाधानकारक असल्याचे संस्थेने म्हटले आहे.निसर्ग संवर्धनासारख्या तुलनेने दुर्लक्षित विषयासाठी नागरिकांनी पुढाकार घेणे ही सकारात्मक बाब असून, या माध्यमातून हजारो कुटुंबांपर्यंत पक्षी आणि जैवविविधता संवर्धनाचा संदेश पोहोचल्याचा दावा संस्थेने केला आहे. निकाल जाहीर होण्याच्या कार्यक्रमास पर्यावरण क्षेत्रातील कार्यकर्ते, निसर्गप्रेमी आणि विविध माध्यमांतून संवर्धनासाठी योगदान देणारे प्रतिनिधीही उपस्थित राहणार आहेत.

ागातून नाशिकच्या निसर्ग संवर्धनाच्या चळवळीला व्यापक स्वरूप देण्याचा प्रयत्न या उपक्रमातून झाला असून, सहभागी नागरिक, संस्था, व्यक्ती, प्रसारमाध्यमे आणि पर्यावरणप्रेमींचे ङ्कआपलं पर्यावरणफ संस्थेचे शेखर गायकवाड यांनी आभार मानले.

'इंद्रधनुष्य'मध्ये युवा प्रतिभांचा जल्लोष

नाशिक । प्रतिनिधी

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या मुख्यालयात १९ ते २३ नोव्हेंबरदरम्यान २२ व्या महाराष्ट्र राज्य आंतरविद्यापीठीय सांस्कृतिक युवा महोत्सव ङ्कइंद्रधनुष्यफचे आयोजन करण्यात आले आहे. राज्यपाल तथा सर्व विद्यापीठांचे कुलपती जिष्णू देव वर्मा यांच्या निर्देशानुसार आयोजित या महोत्सवात राज्यातील २७ विद्यापीठांतील सुमारे १२०० ते १३०० विद्यार्थी सहभागी होणार आहेत. संगीत, नृत्य, वाङ्मयीन कला, रंगमंचीय कला आणि ललित कला या पाच विभागांत २९ स्पर्धा होणार आहेत. एकांकिका, मूकाभिनय, मिमिक्री, शास्त्रीय गायन, समूहगायन, वाद्यवादन, वक्तृत्व, वादविवाद, चित्रकला, रांगोळी, छायाचित्रण, प्रश्नमंजुषा आणि शिल्पकला अशा विविध कलाप्रकारांतून युवा कलावंतांना आपली प्रतिभा सादर करण्याची संधी मिळणार आहे.

बाळासाहेबांच्या प्रतिमेच्या अवमानाचा निषेध

ठाकरे गटाचे 'जोडो मारो' आंदोलन

नाशिक । प्रतिनिधी

काँग्रेस नेत्या सोनिया गांधी यांच्या पुस्तकात स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांचा अवमान झाल्याचा आरोप करत शिंदेसेनेच्या प्रवक्त्यांनी पत्रकार परिषदेत पुस्तकातील पाने फाडली. मात्र, याच पत्रकार परिषदेदरम्यान प्रवक्त्या शायना एनसी यांनी शिवसेनाप्रमुख हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांचा फोटो फाडल्याची घटना समोर आली. या घटनेच्या निषेधार्थ शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्यावतीने शालिमार येथे ङ्कजोडो मारोफ आंदोलन करण्यात आले.

या आंदोलनात शिवसैनिकांनी संबंधित घटनेचा तीव्र निषेध नोंदविला. बाळासाहेब ठाकरे हे शिवसैनिकांचे श्रद्धास्थान असून त्यांच्या प्रतिमेचा अवमान कदापि सहन केला जाणार नाही, अशी भूमिका



आंदोलकांनी मांडली. यावेळी जोरदार घोषणाबाजी करून संबंधितांविरोधात संताप व्यक्त करण्यात आला.

या आंदोलनात पक्षाचे पदाधिकारी निलेश साळुंखे, ऋषी वर्मा, बाळासाहेब कोकणे, महेश बडवे, सुभाष गायधनी, सचिन बांडे, विशाल कदम, संजय परदेशी, राहुल दराडे, मंदार बर्वे, संजय थोरवे, पप्पू टिळे, संजय चिंचोरे, नितीन जाधव, सरप्रीतसिंग बल, चेतन दाते आदी उपस्थित होते.

नाशिकमध्ये रक्ताचा तुटवडा

ओ, ए पॉझिटिव्हसह निगेटिव्ह रक्तगटाची कमतरता

नाशिक । प्रतिनिधी

सण-उत्सवांचा काळ, बदलते हवामान आणि शहरात वाढलेले आजार यामुळे रक्तदानाचे प्रमाण घटल्याने नाशिक शहरातील विविध रक्तपेढ्यांमध्ये रक्ताचा तुटवडा निर्माण झाला आहे. विशेषतः ओ पॉझिटिव्ह, ए पॉझिटिव्ह तसेच विविध निगेटिव्ह रक्तगटांचा साठा अत्यल्प असल्याने रुग्णांच्या नातेवाइकांना रक्तासाठी एका रक्तपेढीतून दुसऱ्या रक्तपेढीत धावपळ करावी लागत आहे.

या पार्श्वभूमीवर सामाजिक संस्था, महाविद्यालये, उद्योगसमूह आणि तरुणांनी पुढाकार घेऊन रक्तदान शिबिरे आयोजित करावीत, असे आवाहन रक्तपेढी चालकांनी केले आहे. अपघातग्रस्त, थॅलेसेमियाग्रस्त बालके, प्रसूतीतील महिला तसेच मोठ्या शस्त्रक्रिया होणाऱ्या रुग्णांना अनेकदा तातडीने रक्ताची आवश्यकता असते. मात्र, सध्या रक्तपेढ्यांकडे उपलब्ध साठ्याच्या तुलनेत रक्ताची मागणी अधिक असल्याने अडचणी निर्माण होत आहेत. गेल्या काही दिवसांत डेंग्यू, मलेरिया आणि व्हायरल तापाच्या रुग्णसंख्येत वाढ झाली आहे. आजारपण किंवा औषधोपचार सुरू असल्याने अनेक नियमित रक्तदाते रक्तदान करू शकत नाहीत. त्यातच महाविद्यालयांना सुट्ट्या आणि विविध कार्यक्रमांमुळे नियमितपणे होणाऱ्या रक्तदान शिबिरांची संख्या कमी झाली आहे.

प्रधानमंत्री पीक विमा योजनेचा लाभाचे आवाहन

नाशिक । पिकांच्या होणाऱ्या नुकसानीपासून शेतकऱ्यांना आर्थिक संरक्षण देण्यासाठी सुधारित प्रधानमंत्री पीक विमा योजना रब्बी हंगाम २०२६ राबविण्यात येत आहे.

राज्यात सन २०२६-२७ या वर्षात एल निनोच्या प्रभावामुळे निर्माण झालेली दुष्काळसदृश परिस्थिती लक्षात घेता पीक विमा योजनेसाठी इच्छुक शेतकऱ्यांनी विहित मुदतीत अर्ज सादर करून या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन तालुका कृषी अधिकारी क्रांती जाधव यांनी केले आहे.या योजनेंतर्गत अधिसूचित पिकांसाठी शेतकऱ्यांना प्रतिहेक्टर विमा हप्ता भरावा लागणार आहे. त्यानुसार गहू बागायती पिकासाठी ९०० रुपये, ज्वारी बागायतीसाठी ७२० रुपये, ज्वारी जिरायतीसाठी ७०० रुपये, उन्हाळी भुईमुगासाठी ८१२ रुपये, तर रब्बी कांद्यासाठी १ हजार ४२५ रुपये विमा हप्ता निश्चित करण्यात आला आहे.

दिवाळीनंतर न्यायालय सुरू, कामकाज ठप्प

नाशिक । प्रतिनिधी

दिवाळीच्या प्रदीर्घ सुटीनंतर न्यायालयीन कामकाज पूर्वपदावर येत असतानाच न्यायालयीन कर्मचाऱ्यांनी बेमुदत संपाचा पुकारल्याने नाशिक जिल्हा न्यायालयासह नाशिकरोड येथील न्यायालयीन कामकाजावर मोठा परिणाम झाला आहे.

त्यामुळे न्यायालयात आलेल्या पक्षकारांना मोठ्या गैरसोयीला सामोरे जावे लागत आहे. नवीन दावे दाखल करणे, अर्जांची नोंदणी,



प्रकरणांच्या नोंदी व फायली हाताळणे, आदेशांच्या प्रमाणित प्रती मिळविणे तसेच जामीन आदेशांच्या अंमलबजावणीसारख्या महत्त्वाच्या प्रक्रियांवर संपाचा परिणाम झाला आहे. त्यामुळे सुनावणीसाठी दूरवरून आलेल्या पक्षकारांना केवळ पुढील तारीख घेऊन परतावे लागत असल्याचे चित्र आहे. उच्च न्यायालयातील कर्मचाऱ्यांप्रमाणे दुय्यम न्यायालयातील कर्मचाऱ्यांनाही सुधारित वेतनश्रेणी लागू करावी, समान काम, समान वेतन या तत्त्वाची अंमलबजावणी करावी, या मागणीसाठी राज्यातील सुमारे ४० हजार कर्मचारी १७ नोव्हेंबरपासून बेमुदत संपावर आहेत. नाशिक जिल्ह्यात सुमारे १३०० कर्मचारी या आंदोलनात सहभागी आहे. संपामुळे न्यायालयीन यंत्रणेतील दैनंदिन प्रशासकीय कामकाजही विस्कळीत झाले आहे. कर्मचाऱ्यांचा प्रश्न तातडीने मार्गी लावावा अशी मागणी वकील आणि पक्षकारांकडून होत आहे.

तांदूळ दर वाढण्याची शक्यता

नाशिक । परतीच्या पावसाने पाठ फिरवल्यामुळे यंदा भात उत्पादनात मोठी घट होण्याचे संकेत निर्माण झाले आहेत. बदलते हवामान, पावसामुळे विस्कळीत झालेले वेळापत्रक आणि पावसाचा अभाव यामुळे भातशेतीचे गणित पूर्णपणे बिघडले आहे.

याचा थेट परिणाम तांदळाच्या उपलब्धतेवर होऊन आगामी काळात तांदळाचे दर वाढण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

कोट्यवधींच्या कामांनंतरही नव्या प्रस्तावांचा सपाटा

नाशिक । प्रतिनिधी

सिंहस्थ कुंभमेळ्याच्या आयोजनासाठी सुमारे ३५ हजार कोटी रुपयांची विकासकामे हाती घेण्यात आलेली असतानाही नव्या कामांचे प्रस्ताव आणण्याचा सिलसिला सुरूच असल्याने नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणापुढे आर्थिक नियोजनाचे मोठे आव्हान उभे राहिले आहे. कुंभमेळा योजनेचे आर्थिक आकारमान वाढत चालल्याने आता प्रस्तावांना कात्री लावण्याची वेळ प्राधिकरणावर आली आहे.

सिंहस्थ कुंभमेळ्याचे नियोजन व व्यवस्थापन प्रभावीपणे करण्यासाठी राज्य शासनाने प्रयागराजच्या धर्तीवर नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणाची स्थापना केली असून, त्याला कायदेशीर अधिकार देण्यात आले आहेत. विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम यांच्या अध्यक्षतेखालील या प्राधिकरणात विविध शासकीय विभागांतील २२ अधिकाऱ्यांचा समावेश आहे. गेल्या १४ महिन्यांत प्राधिकरणाने हजारो कोटी रुपयांच्या विकासकामांना प्रशासकीय मान्यता दिली.

पहिल्या टप्प्यात दीर्घ कालावधी लागणाऱ्या कामांना प्राधान्य देण्यात आले. मात्र, ध्वजारोहण सोहळ्याच्या तयारीपर्यंत शिखर समितीची मान्यता नसतानाही काही निकडीची कामे पुढे रेटण्यात आली. त्यामुळे आता अशा प्रकारे आयत्यावेळी बैठकीत आणल्या जाणाऱ्या विषयांना चाप लावण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. शिखर समितीची मान्यता घेतल्याशिवाय कोणत्याही नव्या कामाला कार्यारंभ आदेश देऊ नयेत, अशी भूमिका घेण्यात आली आहे.